# नवी मुंबई महानगरपालिका

कार्यालय : न.मुं.म.पा. मुख्यालय, भूखंड क्र.१,
किल्ले गांवठाण जवळ, पामबीच जंक्शन, से -१५ए,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : ०२२-२७५६ ७०७०/७१
फॅक्स : ०२२-२७५७७०७०

# Navi Mumbai Municipal Corporation

Office : N.M.M.C. Head Quarter, Plot No.1,
Near Kille Gaonthan, Palmbeach Junction,
Sec-15A, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Tel. : 022 - 2756 7070 /71
Fax. : 022 - 27577070


जा.क्र./नमुंमपा/नरवि/बा.प./Online No. 20171CNMMC11754/२६३३/२०१७

दिनांक :- २९/०६/२०१७

प्रति,
मे. भगवती इन्फ्रा,
भूखंड क्र. ७ व ७ए, सेक्टर क्र. १३,
नेरुळ, नवी मुंबई

नस्ती क्र. - नमुंमपा/वि.प्र.क्र..-- Online No. 20171CNMMC11754

विषय :- भूखंड क्र. ७ व ७ए, सेक्टर क्र. १३, नेरुळ, नवी मुंबई या जागेत निवासी व वाणिज्य कारणासाठी बांधकाम परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- आपले वास्तुविशारद यांचा दि. २६-०४-२०१७ व १२-०६-२०१७ रोजीचा Online अर्ज.

महोदय,

भूखंड क्र. ७ व ७ए, सेक्टर क्र. १३, नेरुळ, नवी मुंबई या जागेत निवासी व वाणिज्य कारणासाठी बांधकाम परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस वरील संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. संदर्भाधिन जागेत निवासी व वाणिज्य उपयोगासाठी बांधकाम परवानगी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनीयम १९४९ च्या कलम २५३ व २५४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ (१) (३) मधील तरतुदीनुसार सदर पत्रातील १ ते ६ अटी व बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रातील पुर्तता/पालन करणेचे अटीसापेक्ष प्रकरणी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मंजुर करण्यात येत आहे.

पाणी पुरवठा व मलनि:सारण सुविधा आवश्यक शुल्क भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील.

सार्वजनिक स्वरुपाच्या रस्त्यावर व गटारीत बांधकाम साहित्य पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. अशाप्रकारे बांधकाम साहित्य रस्त्यावर अथवा इतर सार्वजनिक जागेवर आढळुन आल्यास आपणावर कार्यवाही करणेबाबत संबंधित विभागास कळविणेत येईल किंवा बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबतची कार्यवाही सुध्दा करण्यात येईल याबाबतची नोंद घ्यावी.

बांधकाम सुरु असताना जागेवरील रिकामे गाळे/सदनिका यांची संरक्षणाची जबाबदारी संबंधित जमिनमालक/भुखंडधारक/गाळेधारक यांची राहील. तसेच अर्धवट बांधलेल्या जागेचा गैरवापर होऊ नये म्हणुन संबंधित भुखंड धारकाने कुंपण भिंत बांधुन त्या ठिकाणी अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. गैरकृत्य करताना आढळल्यास संबंधितांस कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

भूखंड सखल भागामध्ये असल्यास जमीनीची पातळी **(Ground Level)** भरणी करुन उंच करावी. जमीनीची पातळी ही रस्ता आणि **Sewer Line** यांच्यापेक्षा उंचावर असली पाहिजे. सांडपाणी, पावसाळ्याचे पाणी आणि मल यांचा निचरा योग्यपणे होऊन भूखंडामध्ये पाणी साचणार नाही अशी भूखंडाची पातळी तयार करावी.

इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे करण्यात यावे. बांधकामामध्ये फेरफार अथवा वाढीव बांधकाम करावयाचे असल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार सुधारित बांधकाम नकाशे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. मंजुर नकाशा व्यतिरिक्त बांधकाम केल्यास ते कायद्यातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

कृ. मा. प.